शैक्षणिक संदर्भ अंक १२४ जून-जुलै २०२०

# अनोळखी विषाणू - माझी गोष्ट

लेखक: लॅरी क्युबन          अनुवाद: यशश्री पुणेकर

# अनोळखी विषाणू - माझी गोष्ट

**लेखक: लॅरी क्युबन        अनुवाद: यशश्री पुणेकर**

***प्रा. लॅरी क्युबन त्यांना भेटलेल्या विषाणूची ओळख करून देत आहेत. वर्तमान स्थितीची सांगड मागच्या अनुभवाशी घालत त्यांनी स्वत:ची गोष्ट सांगितली आहे. भूतकाळ मनात राहून जातो, काही चित्रे कोरून ठेवतो, त्यातूनच गोष्ट घडत राहते.***

सॅन अँजेलो पश्चिम टेक्सास मध्ये आहे. आबिलिन आणि मेक्सिकोची सीमा यांच्या मध्ये. शेते, तेलाच्या विहिरी, गुरांसाठी गवताळ कुरणे, उबदार आणि आरोग्यदायी हवामान असलेल्या सॅन अँजेलोचे रूप एका वर्षात असे काही बदलले की मंडळी घाबरूनच गेली*.

वसंत ऋतूच्या मध्यात इथल्या एका स्थानिक मुलाला विषाणूजन्य आजार झाल्याची बातमी वर्तमानपत्रात आली. मागच्या वसंतात असाच आजार एखाद्या वादळासारखा येऊन गेला होता. पण तेव्हा तो सगळीकडे पसरला नव्हता, हा मात्र पसरू लागला.

‘ताप आलाय, हातपाय दुखतायत’ अशा तक्रारी घेऊन शेनॉन मेमोरिअल हॉस्पिटलमध्ये पालक मुलांना घेऊन येऊ लागल्याची बातमी वर्तमानपत्रात झळकली. ही मुलं काही दिवसात दगावत. दहा महिन्याची एस्पेरेन्झा रामिरेझ, सात वर्षांचा बिली डॉयल, चार वर्षांची सुसान बार आणि कितीतरी... शहराच्या आरोग्य अधिकाऱ्याच्या म्हणण्यानुसार

ही एक साथच आली होती. या साथीचे कारण काही समजत नव्हते, त्यामुळे काय काळजी घ्यायची नी काय उपाय करायचा याबाबत संभ्रम होता. आरोग्य अधिकाऱ्याने सॅन अँजेलोमधील मुलांना गर्दीची ठिकाणे टाळा, वारंवार हात धुवा आणि भरपूर विश्रांती घ्या असा सल्ला दिला.

एका महिन्यानंतर, रूग्णसंख्या  साठपेक्षा जास्त झाल्यामुळे नगर परिषदेने थिएटर आणि चर्चसह घरातदेखील एकत्र येऊन करण्याच्या सर्व कार्यक्रमांवर बंदी घालण्याचा निर्णय घेतला. पर्यटकांनी शहरात येणं बंद केलं. अर्थव्यवस्था ढासळली. एका स्थानिक डॉक्टरने सांगितले, "आम्ही अशा टोकावर पोचलो आहोत.... की लोक हस्तांदोलनही करत नाहीत".

ही १९४९ ची गोष्ट आहे २०२० ची नाही. आणि तो रोग होता पोलिओ... कोविड १९ नव्हे.

सॅन अँजेलोमध्ये ही साथ यायच्या आधी पाच वर्षं, म्हणजे १९४४ मध्ये, मला  पोलिओ झाला होता. पण मी नशीबवान ठरलो. एका पायाचा पोटरीचा स्नायू अधू झाला, पण मी वाचलो. मी तेव्हा दहाच वर्षांचा होतो. त्यामुळे त्यावेळी प्लेग नावाने ओळखला जाणारा हा रोग मला झाल्यामुळे माझ्या पालकांना किती भीती वाटली असेल याबद्दल मला कल्पना नव्हती, पण आता विचार करता मला ते जाणवतं.

त्यावेळच्या पोलिओप्रमाणेच आत्ताच्या करोना विषाणूच्या उत्पत्तीचेदेखील कारण नक्की सांगता येत नाही. जागतिक पातळीवर त्याच्या चाचण्या करण्याची गती धीमी आहे. त्यावर काही औषध किंवा लस उपलब्ध नाही. चाचण्या करण्यामधील त्रुटीमुळे आणि प्रचंड प्रमाणात लागण झाल्यामुळे या रोगाने होणारा मृत्युदरही निश्चितपणे सांगता येत नाहीये. या

रोगाचा प्रसार सगळ्या जगभर झाला आहे. ही केवळ साथ न राहता त्याचे स्वरूप आता महामारीचे झाले आहे.



***पोलिओग्रस्त जुळ्या बहिणी***

माझ्या देशाला, मित्रमंडळींना, कुटुंबाला ग्रासू पाहणाऱ्या करोना विषाणूची भीती आज मला वाटते आहे. पाऊणशे वर्षांपूर्वी जेव्हा मला पोलिओ झाला होता, तेव्हा माझ्या आईवडिलांना जशी भीती वाटली असेल तशीच ती आहे.

१९४४ ची पोलिओची साथ पिट्सबर्ग येथे पसरली. मलाही तेव्हाच लागण झाली. मला चांगलं आठवतंय मी कित्येक आठवडे दवाखान्यात होतो आणि नंतर कित्येक महिने घरी पडून होतो...माझ्या आईवडिलांची आणि भावंडांची चिंता आणि काळजी मला अजूनही आठवते. मी घरात सर्वात लहान होतो.

लकव्याने स्नायू निर्जीव होतात आणि कधीकधी श्वास घेणे इतके अवघड होते की त्यामुळे मृत्यू येतो. अशा रुग्णांना जिवंत ठेवण्यासाठी तेव्हा कृत्रिम फुफ्फुसांचा वापर केला जाई. लोखंडी फुफ्फुसांचा (आयर्न लंग्ज) शोध त्याआधीच लागलेला होता. हे दुसऱ्या महायुद्धाचं तिसरं वर्ष होतं. माझे दोन्ही भाऊ नौदल आणि हवाई दलात सेवा बजावत होते.

माझ्या आई वडिलांना त्यांची काळजी होतीच आणि त्यात मी पोलिओग्रस्त झालो. मित्र आणि शेजाऱ्यांनी आमच्या घराकडे पाठ फिरवली.



***पोलिओच्या आघातातून वाचवण्यासाठी लोखंडी फुफ्फुसाचा वापर***

दवाखान्यात असताना आणि घरी आल्यावरही आई माझ्या पायांना कोको बटरने मालीश करायची, ते मला स्पष्टपणे आठवतंय. माझा पाय चांगलाच लुळा पडला होता. मला चालता येत नव्हतं. कित्येक महिने मला शाळेत जाताच आलं नव्हतं. जेव्हा मी परत शाळेत जायला लागलो तेव्हा मी लंगडत चालत असे. तेव्हापासून त्या कोको बटरचा वास माझ्या डोक्यात भिनलाय.

रोज सकाळी मला कच्च्या अंड्याचा बलक प्यावा लागत असे, ते तर मी विसरूच शकत नाही. पोलिओमुळे माझ्या पायाच्या स्नायूंचं जे नुकसान झालं होतं, ते भरून काढण्यासाठी जास्त प्रथिनांची गरज आहे असं डॉक्टरांनी सांगितलं होतं. त्यामुळे बाबा रोज सकाळी कामावर जायच्या आधी दोन अंडी फोडून ग्लासात ओतून ढवळत आणि मी ते संपवेपर्यंत थांबून राहात. अनेक महिने हा क्रम चालू राहिला. पुढे मला जरा शक्ती आली, माझं वजनही वाढलं आणि सावकाश का होईना पण मी चालू आणि पळू लागलो तेव्हा कुठे ते थांबलं.

माझ्या आई वडिलांना मी मरेन की काय अशी वाटणारी भीती मी शाळेत जायला लागल्यावर हळूहळू नाहीशी झाली, असा माझा अंदाज आहे. तोवर दुसरं महायुद्धपण संपुष्टात आलं. माझे दोघे भाऊपण घरी आले. हळूहळू मी बोलिंग, बेसबॉल, बास्केटबॉल

खेळण्याइतपत सशक्त झालो. आज मी त्या ७५ वर्षांपूर्वीच्या काळाकडे वळून बघतो तेव्हा माझ्या पालकांना त्या वेळी वाटणाऱ्या भीतीची कल्पना मला येते. तशीच भीती आज मला अन् अगणित कोट्यवधी कुटुंबांना आत्ता कोविड १९ ची वाटते आहे.

### *पोलिओ विषाणू*

*पोलिओ हा रोग माणसाला शतकानुशतके माहीत होता, पण त्याचा विषाणू १९व्या शतकाच्या सुरुवातीच्या काळात वेगळा करता आला. जगभर या रोगाच्या अनेक वेळा साथी आल्या. या रोगामुळे मुलं आणि मोठी माणसं आजारी पडत, त्यांचे अवयव अधू होत, कधी मृत्यूही येई. त्याला 'बाल अर्धांगवात' म्हणत. तो कशामुळे होतो तेच तोपर्यंत माहीत नव्हतं. त्यामुळे त्याला प्रतिबंध करणं शक्यच नव्हतं. जिथे जिथे या आजाराची लागण झाली, तिथे संसर्गाच्या भीतीने कळस गाठला. त्यावर काही औषध नव्हते. केवळ शरीराचं होणारं नुकसान कमी करण्यासाठी हातापायाला मालीश केलं जाई आणि भोवती कापड गुंडाळून ठेवलं जाई.*

*अमेरिकेत लहान, मोठे, गरीब, श्रीमंत अशा सर्वांनाच ग्रासणारा हा रोग वारंवार उद्भवत होता. १९१६ साली आलेल्या साथीत २७००० अमेरिकन लोकांना त्याची लागण झाली. एकट्या न्यू यॉर्क शहरात ८४०० लोकांना लागण झाली आणि २४०० लोक बळी पडले. पाच वर्षांनंतर, फ्रँकलिन डेलानो रुझवेल्ट यांना वयाच्या ३९ व्या वर्षी या आजाराने गाठले. पुढे त्यांना आयुष्यभर लेग ब्रेसेस (कुबड्यांसदृश विशिष्ट पादत्राणे) घालावे लागले. अगदी ते अमेरिकेचे अध्यक्ष असतानाही (१९३३-१९४५). १९५० च्या पुढेच यावरची लस उपलब्ध झाली.***

सध्या माझ्यासारख्या अनेक लोकांप्रमाणे मी घरीच असतो, फोनवर बोलतो, मेसेज पाठवतो आणि गर्दीपासून दूर राहतो. अगदी मित्र, कुटुंबीय भेटले तरी मिठ्या न मारता मुठीवर

मुठी आपटतो. वारंवार हात धुतो. शाळा, परिषदा, क्रीडा स्पर्धा एकेक बंद झाल्याचं बघतोय आणि मनोरंजनाच्या ठिकाणांना टाळे लागलेलेही बघतोय.

मला भीती आणि चिंता वाटतेय का? हो.

हा विषाणू लवकर नष्ट व्हावा याची मी अगदी वाट पाहतो आहे.

मला आठवताहेत १९४४ सालचे माझे आईवडील, १९४९ सालचे सॅन अँजेलोमधले पालक. त्या अपरिचित विषाणूला ते जसे घाबरले होते तसेच आज आपण चिंतित आहोत. आज जणू तो भूतकाळ पुन्हा वर्तमान होऊन आपल्या डोळ्यापुढे उभा राहिला आहे.

मला अजूनही तो कोको बटरचा वास येत राहतो आणि कुठल्याही स्वरूपातली अंडी मला अजूनही आवडत नाहीत.

** सॅन अँजेलोच्या वर्णनासाठी आणि १९४९ च्या साथीच्या माहिती साठी संदर्भ – डेव्हिड ओशिन्स्की, पोलिओ: ॲन अमेरिकन स्टोरी (न्यू यॉर्क: ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, २००५) पाने १ ते ४.*

*** संदर्भ – वरील पुस्तकातील पाने १९ ते २३.*

§§§

---

लेखक: **लॅरी क्युबन,** सामाजिक शास्त्राचे प्राध्यापक, सध्या स्टॅनफर्ड युनिव्हर्सिटीत प्रोफेसर एमेरिटस् ऑफ एज्युकेशन. अनेक पुस्तके प्रसिद्ध.

मराठी रूपांतर: **यशश्री पुणेकर**, शैक्षणिक संदर्भ गटात सहभागी.

इमेल: yashashreegpunekar@gmail.com

*(कळीचे शब्द: पोलिओ, पोलिओ  विषाणू, १९४४ ची पोलिओची साथ)*